INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# गोरबंजारा समाज : गोरवट, होळीउत्सव, धुंडसंस्कार आणि लेंगीगीत

## (Gorbanjara Community: Culture (Gorwat), Holi Festival, Dhund Sanskar and Folksongs)

**डॉ. रमेश जाधव**
प्राध्यापक,
मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
E-mail: prof.rameshjadhav2021@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/02.2025-99239983/IRJHIS2501008**

**प्रास्ताविक आणि विषयप्रवेश :**

महाराष्ट्र हा एक पुरोगामी आणि सहिष्णू असा भूप्रदेश आहे. १ मे १९६० या रोजी अस्तित्वात आलेला हा भारताचं पंधरावं घटकराज्य असून महाराष्ट्राची प्रमाण, राज व व्यवहार भाषा 'मराठी' ही असली तरी इतरही पुष्कळ बोलीभाषा या ठिकाणी खूप वर्षांपासून बोलल्या जातात. या बोली मराठी भाषेस शब्दकळा पुरवून तिचा भाषिक शब्दभांडार समृध्द करतात. प्रमाणभाषेला या विविध बोली सुदृढ व सुडौल बनवितात. असाच एक स्वतंत्र बोलीभाषा व वेशभूषा आणि गोरवट (संस्कृती) जीवापाड जपणारा समूदाय कित्येक वर्षांपासून महाराष्ट्राच्या पवित्र व उदारमतवादी भूमित स्थाईक झालेला आहे. तो समाज म्हणजे 'गोरमाटी' हा लोकसमूदाय होय. हा समूदाय महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात बंजारा, बंजारी, गोरबंजारा, लमाणी, लबाणी, लंम्बाडी आदी नावाने सुपरिचित आहे. या समाजाची स्वतंत्र बोलीभाषा असून तिला ते 'गोरबोली' किंवा ‘गोरमाटी बोली’ असे म्हणतात. या संदर्भात पांडूरंग पाटील म्हणतात, “बनजारा समाजात राजस्थानी — हिंदी मिश्रीत जी भाषा बोलली जाते. तिला ‘गोरमाटी’ भाषा असे म्हणतात. या भाषेत त्या त्या प्रांतातील मूळ भाषेतील काही शब्द सामील होतात. जे गोर (श्रेष्ठ बनजारे आहेत) ते गोर बनजारा बोली बोलतात.”[१] या बोलीला स्वतंत्र लिपी नाही; त्यामुळे गोरमाटींनी स्व 'इतिहास' व 'गोरवट' मौखिक परंपरेने जीवापाड जतन करुन ठेवली आहे. गोरमाटी हा खूप उत्सवप्रिय असा लोकसमूदाय आहे. दिवाळी, दसरा, तिज आणि विशेषतः होळी ते खास 'गोरवट' परंपरेनुसार खूप उत्साहात साजरी करतात. 'गोरवट' ही संज्ञा 'बंजारा संस्कृती' या अर्थाने या ठिकाणी योजलेली आहे. गोरमाटी समाजात खूप प्राचीन काळापासून होळी हा सणोत्सव अगदी हर्षोल्हासात साजरा करण्याची वैभवशाली परंपरा आहे. गोरमाटींची होळी कोरपेक्षा (इतर समाजापेक्षा) खूपच भिन्न व विलग असते. महाराष्ट्रातील हिंदूसमाजात होळी पौर्णिमेस फाल्गुन महिन्यात दोन दिवस साजरी करण्याची परंपरा दिसून येते तर

गोरमाटी हाही समाज दोन दिवसच होळी उत्सव साजरा करतो. परंतु ज्यादिवशी कोर समाज रंगपंचमी खेळतो त्या दिवशी गोरमाटी अगदी सकाळी सूर्योदयाला तांड्याच्या बाहेर पूर्वदिशेला जाऊन सामूहिकपणे होळी पेटवतो. म्हणजे गोरबंजारे फाल्गून महिन्यात कृष्ण प्रतिपदेला होळी दहन करतात. होळी हा उत्सव गोरमाटी समाजात दोनदृष्टीने महत्त्वपूर्ण असतो. एक होळीला घरातील मृतपूर्वजांना पितरे घालण्यात येतात. या विधीला गोरवट नुसार 'धबुकार' विधी असे म्हणतात. दुसरे म्हणजे होळीला या वर्षात जन्मलेल्या मुलांचे बारशे करण्याची आगळी- वेगळी प्रथा या समाजात प्रचलित आहे. गोरवटमध्ये या संस्कार विधीस 'धुंड' अशी संज्ञा रुढ आहे. उपरोक्त दृष्टीनेहोळी या उत्सवाला गोरमाटी खूपच महत्त्व देतात.

होळी हा जसा 'धबुकार' व 'धुंडकरणे' या संस्कार विधीसाठी महत्त्वपूर्ण उत्सव आहे. या संदर्भात मोहन चव्हाण म्हणतात, “गोर वंशावली के लोग देवी की पुजा करते है, लेकिन कुलगोत्र वंशावली में मृत्यु पाने वाले व्यक्ति के नाम से धुबकार देने की प्रथा इस समाज मे है।”[२] तद्वतच होळी हा उत्सव अपरिमित आनंद देणारा व हा जीवनानंद नृत्य आणि गीतातून गोरगण होळी उत्सवाप्रसंगी मनसोक्त लुटतात. मदमस्त होऊन गोरस्त्रिया व पुरुष डफाच्या तालावर सामूहिकरित्या गीत गातात व लयदार आणि ढंगदार पध्दतीने फेर धरुन नृत्यही करतात. होळीप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या ठसकेबाज गीतास गोरवट मध्ये 'लेंगी' तर नृत्यास 'पाईनृत्य' किंवा 'लेंगीनृत्य' असे शब्द रुढ आहेत. डॉ. अशोक फालके या संदर्भात लिहितात, “होली के इन नृत्यों में स्त्रियों के तथा पुरुषों के अलग-अलग नृत्य हैं। स्त्रियाँ उपरेरो नाच, डोडो-नगारा नाच, पीरनाच, राधा नाच तथा लंगडी पायी नाच नाम के नृत्य करती है। पुरुष वर्ग में इस अवसर पर डंडा-जोडे रो नाच तथा टिपरी-पायी नाच प्रचलित है।”[३] होळी प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या लेंगीगीतात व पाईनृत्यात अविवाहित मुली सहभागी होत नाही. पाईनृत्य करणाऱ्या व लेंगीगीत गाणाऱ्या पुरुषांना 'गेरिया' तर स्त्रियांना 'गेरणी' असे केवळ होळीउत्सवाप्रसंगी संबोधण्याची प्रथा या समाजात प्रचलित दिसते. विशेषतः गोरतांड्यात त्या वर्षी मुलाचा 'धुंड' हा संस्कारविधी नसेल तर होळी दहन केल्या जात नाही. जर होळी पेटवली तर त्यास 'वांजहोळी' असे म्हणतात. होळी पेटवण्यासाठी लागणारा विस्तव इतरसमाजाच्या होळीतून चोरून आणावा असा एक संकेत या समाजात रुढ आहे. विस्तव चोरून आणण्यासाठी तांड्यातील वयोवृध्द मंडळी नायक - कारभारीच्या संमतीने या वर्षात विवाहकर्तव्य असणाऱ्या दोन तरुणांची नेमणूक करतात. हे तरुण विगोत्री असतात. त्यांना 'दांड्या' किंवा 'दांडोकाढेवाळे' असे म्हणतात. हे दांड्या (दोन तरुण) होळी पेटवण्यासाठी लागणारी इत्यंभूत सामग्री गोळा करतात. एका अर्थाने या वर्षांच्या होळीउत्सवाचे व त्यानिमित्त होणाऱ्या 'धुंड' या संस्कार विधीप्रसंगीचे ते 'हीरोच' असतात.

होलीकोत्सवाची चाहूल गोरमाटींना एकमहिना अगोदर पासूनच लागते. रानावनात कृषिची विविध कामे करताना मनोरंजन व श्रमपरिहारासाठी बंजारा पहाडी आवाजात लेंगी गायला प्रारंभ करतो किंवा दिवसभर कष्टाची कामे करुन थकून, भागून घरी परत आल्यानंतर रात्रीच्यावेळी अंगणासमोर बसून डफाच्या तालावर लेंगीची सामूहिक मैफल सजवतात. त्यावेळी एका ठिकाणी बसून सामूहिकपणे लेंगीगीते म्हटली जातात. त्या लेंगीस 'बेटीरलेंगी' असे म्हणतात तर होळीच्या दिवशी व 'धुंड' या संस्कारविधी प्रसंगी सामूहिकपणे गोलरिंगन करुन डफाच्या तालावर म्हटल्या जाणाऱ्या लेंगीस 'हुबीरलेंगी' व नृत्यास 'पाईनृत्य' असे म्हणतात. बेटीरलेंगी प्रसंगी किंवा कृषिकर्म करताना म्हटल्या जाणाऱ्या लेंगीगीतात नृत्य सादर केले जात नाही. पाईनृत्य फक्त 'हुबीरलेंगी' गातानाच गोर बंजारा स्त्री-पुरुष सादर करतात. कृषिकर्म करताना, गाईगुरे राखताना गोर स्त्री-पुरुष एकएकट्यानेही लेंगी म्हणतात. परंतु 'बेटीरलेंगी' वा 'हुबीरलेंगी' सामूहिकरित्या व डफाच्या साथीने सादर करावी असा संकेत

गोरगणात रुढ आहे. अशा स्वरुपाच्या गोरमाटीच्या लेंगीगीतात त्यांचा सांस्कृतिक इतिहास दडलेला लक्षात येतो. होळीच्या प्रसंगी म्हटल्या जाणारी 'लेंगी' म्हणजे गोरगणांच्या सांस्कृतिक इतिहासाचा वैभवशाली सुवर्ण पानच आहे. लेंगी होळीच्या नंतर म्हणजे 'गेर' केल्यानंतर म्हणू नये असाही एक संकेत आहे.

होळीच्या एकमहिन्या अगोदरपासून तर होळीच्या तिसऱ्या दिवसापर्यंत म्हणजे 'गेर' करे पर्यंत ज्या लेंगी म्हटल्या जातात त्यामध्ये रचनातंत्र व आशयतंत्राच्या संदर्भात खूपच भिन्नता जाणवते. या वरुन लेंगीगीताचे विविध रचनाप्रकार संभवतात. तसेच स्त्री-पुरुष दोघेही लेंगी म्हणतात. त्यावरुनही लेंगीगीताचे स्थूलपणे पुढील रचना प्रकार लक्षात येतात.

**लेंगीगीताचे रचनाप्रकार :**

गोरमाटी समाजात होळी उत्सवाच्या प्रसंगी म्हटल्या जात असलेल्या लेंगीगीताचे स्थूलपणे पुढील रचना प्रकार लक्षात येतात.

**छड लेंगी :**

कृषिशी संबंधित व इतर कामे करताना श्रमपरिहायार्थ व मनोरंजनासाठी या स्वरुपाची लेंगीगीते होळीच्या अगोदर एका महिन्यापासून म्हणण्यास प्रारंभ होतो. शेतीची विविध कामे वा गाई-गुरे राखताना गोर स्त्री-पुरुष एकएकटे किंवा जोडीने या स्वरुपाची लेंगी गीते गातात. या स्वरुपाच्या लेंगीस 'छडलेंगी' असे म्हणतात. या लेंगीस डफाची गरज नसते. पहाडी आवाजात पुरुष मंडळी श्रमपरिहायार्थ किंवा मनोरंजनासाठी या स्वरुपाच्या लेंगी गातात. गोरस्त्रियाही सुरेल आवाजात 'छड' लेंगी गातात. अशा स्वरुपाच्या भरपूर लेंगी आढळतात. उदाहरण म्हणून या ठिकाणी एक छडलेंगी देण्यात येत आहे.

"काका कोणीरं काकारी भतीजी लागूरे
काका कोणीरं...
अंबाहेटं वावडीन नवलाख पायरी
चढतू पायरीरो पग रपसो
पग रपसो गीरजाती तो
गीर जातीतो मरजाती
मरजाती तो, घर केरो डुबतो
मरजाती तो घर बापुरो डुबतो
काका कोणीर...."[४]

**भावार्थ :** उपरोक्त लेंगी ही 'छडलेंगी' या प्रकारात मोडते. ही लेंगी गोरपुरुष एकएकट्याने गातात म्हणून त्यास छड लेंगी म्हणतात. प्रस्तुत लेंगी अद्‌भूतरसप्रधान व श्रृंगारपर असून तीत व्यंजकता आहे. काका व पुतणी (भतीजी) यांच्यातील पवित्र नात्याची आठवण पुतणी काकाला करुन देण्याचा प्रयास या लेंगीद्वारे करित असून या पवित्र नात्याला डाग लागू नये असे पुतणी प्रस्तुत लेंगीतून संसूचन करीत आहे. आंब्याच्या हिरव्यागार व घेरदार वृक्षाखाली विहीर असून त्या विहिरीस (वावडी) नवलक्ष पायऱ्या आहेत. अशा विहिरीत मी पाणी भरण्यासाठी उतरलेली असताना तू मात्र माझं लक्ष विचलित का करतोस? जर का माझा तोल गेला, तर मी विहिरीत पडेन; आणि त्यानंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे माझ्या पित्याची इभ्रत

जाणार नाही तर काय? असा भावार्थ प्रकट करणारी प्रस्तुत छड लेंगी गोरपुरुष होळीउत्सवाच्या अगोदर एका महिन्या पासून म्हणण्यास प्रारंभ करतात. ही छडलेंगी खूप लोकप्रिय अशी लेंगी आहे. या स्वरुपाच्या छडलेंगीगीतं प्राय मनोरंजन वा श्रमपरिहार म्हणून गोरगणात म्हटल्या जातात.

**बेटीर लेंगी :**

बेटीरलेंगी गोरतांड्यात होळीच्या अगोदर जवळ-जवळ एका महिन्यापासून म्हणायला सुप्रारंभ होतो. बैठीलेंगी रात्रीच्या वेळी सामूहिकरित्या डफाच्या साथीने गोरमाटी म्हणतात. रात्र झाली की बेटीलेंगीची मैफल प्रत्येक गोरतांड्यात रंगते. ही मैफल अनेकदा दिवस उजेडेपर्यंत रंगत असते. वयोवृध्द पुरुष मंडळी व तरुणांचा त्यात सहभाग असतो. स्त्रिया आजूबाजूला बसून श्रोत्यांची भूमिका पार पाडतात. या लेंगी विविध आशयाच्या असतात. प्रस्तुत लेंगी गीतांना वैशिष्ट्यपूर्ण चाल व लय आणि डफाची साथ असते. त्यामुळे त्या खूपच ढंगदार, बहारदार व कर्णमधूर वाटतात. बेटीर लेंगीचे एक उदा. पहा.

"होळी आयीर रतनसंग डफमंडल होळी आयीर ।। ध्रु ।।
काये केरो लकडा न काय केरो चमडा
चंदणेरो लकडा न मरगलारो चमडा
डफ मंडल रतनसंग डफ मंडलरे
होळी आयीर..."[५]

**भावार्थ :** अरे! रतनसिंग होळीउत्सव खूप समिप आला असून त्यासाठी आपल्याला पूर्वतयारी करायला नको का रे? लेंगी म्हणण्यासाठी डफ तर आवश्यक आहे नारे ! डफासाठी लाकूड व चामडा लागणार नाही का? व डफासाठी लागणारा हा लाकूड असा तसा नको तर चंदनाचा हवाय व डफासाठी कातडे हरणाचे मिळवून आपण उत्तम असा डफ मढवून घेऊरे. मग बघ लेंगी गीताला कसे उधान येते ते. हे लेंगी गीत खूप जोशपूर्ण पध्दतीने गोरमाटी म्हणतात. प्रत्येक गोर स्त्री-पुरुषांना हे लेंगीगीत मुखोतगत असते. मागच्या पिढीकडून ती त्यांना वारसा हक्काने व मौखिक परंपरेने मिळालेली अमूल्य दौलत असते. वारसा हक्काने मिळलेली ही दौलत गोर स्त्री-पुरुषांनी मुखोदगत पध्दतीनी सांभाळून ठेवलेली असते. त्यांनी मौखिकतेने जपलेले हे लोकधन हीच त्यांची संपत्ती आणि ऐश्वर्यही आहे आणि विशेषही आहे.

**पाईलेंगी किंवा हुबीरलेंगी :**

होळी या गोरउत्सवाच्या प्रसंगी गोरगणात सामूहिकरित्या म्हटल्या जाणाऱ्या गीतास 'हुबीरलेंगी' व सामूहिकपणे डफाच्या तालावर उभे राहून व गोलरिंगन करुन सादर करणाऱ्या नृत्यास 'पाईनृत्य' असे म्हणतात. पाईनृत्य दोनगटात पुरुष मंडळी विभागणी करून करतात. गोरस्त्रिया सुध्दा पाईनृत्य स्त्रियांचा वेगळा समूह करून सादर करतात. पायांची विशिष्ट लयदार पुढेमागे होणारी हालचाल करून हे नाच केल्या जात असल्यामुळे या नृत्यास 'पाई' असे म्हणत असावे. पाईनृत्याच्या समयी एक गट अगोदर लेंगीगीताचे धृवपद म्हणतो नंतर मागोमाग दुसरा गट तेच कडवे सामूहिकपणे म्हणतात. पुरुषांनी केलेल्या गोलरिंगणात मध्यभागी उभा राहून एक माणूस डफवाजवतो त्यास 'ढालीया' म्हणतात. या संदर्भात डॉ. रुक्मिणी पवार लिहितात, "बंजाराच्या सामाजिक व्यवस्थेते ढालियांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ स्वरुपाचा होता. वर्णव्यवस्थेत शुद्रांचे जसे जीवन होते त्याप्रमाणे ढालिया जमातीचे जीवन होते. ज्या ठिकाणी बंजाराचा तांडा असे त्या ठिकाणी एका टोकाला ढालियाचे

घर असे. ढालिया जातीतील स्त्रिया तांड्यात होणाऱ्या विवाहाच्या वेळी नृत्य, गायन करीत असत. ढालिया हालगी वाजवीत आणि स्त्रिया हालगीच्या तालावर नृत्य करीत असत."[६] डफाच्या ठेक्यावर व लेंगीगीताच्या तालावर खूप लयदार व ढंगदार शैलीत गोरमाटी अगदी जल्लोषात 'पाई' घालतात. पाईनृत्य प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या लेंगीचे अनेक विध विषय व नृत्यप्रकार असतात. त्यांचा प्राचीन इतिहास व संस्कृतीचा या लेंगी दर्पणच असतात. या लेंगी दीर्घ स्वरुपाच्या व कथात्मक असतात. या आशय स्वरुपाची एक गोर लेंगी पहा -

"धरती तोपर अंबर नईये कोई धरती तोपर...
अंबर व्हेगेरे एक चांदा न सुरीया
नवलाख तारा ओरे साथचाले
ओरे सोबत चले, ओरे संगत
चले, घरती तोपर..."[७]

उपरोक्त लेंगीगीत पाईनृत्य करुन डफाच्या साथीने गोरपुरुष मंडळी सादर करतात. हे लेंगीगीत गोरमाटी विशिष्ट अर्थाने म्हणतात. गोरतांड्यात या वर्षी जर कोणाचा मृत्यू झाला असेल तर त्या सगे-सोयऱ्यांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन केल्यानंतर वरील लेंगी गातात. त्यावेळी ते या लेंगीद्वारे सांगतात की, मृत्यू ही अटळ बाब असून पृथ्वीवर कोणीच अमर नाही. कोणताही माणूस जन्माने नव्हे तर कर्माने अमर ठरतो. याचे विविध दाखले देत प्रस्तुत लेंगी गोरगण म्हणतात. एका अर्थाने मृत्युविषयक तत्त्वज्ञान या लेंगीगीताच्या माध्यमाने गोरमाटी सांगण्याचा प्रयत्न करतात. माणूस हा मर्त्य असून त्यांनी केलेल्या कार्याच्या रुपानेच तो सदैव अमर ठरतो हे या लेंगीमधून ते सूचवतात. म्हणून मृत्यूबद्दल दु:ख उगाळत बसू नका. दु:ख झटकून होळीउत्सवात आनंदाने आमच्या सोबत सहभागी व्हा. असे नम्र आव्हाण ते आपल्या गोरगणाना करतात.

**शृंगारिक लेंगी :**

होळीच्याप्रसंगी लैंगिक विषयावरील खूप लेंगीगीते गोरस्त्रिया व पुरुषमंडळी मनात कोणताही किंतू परंतु न ठेवता अगदी स्वच्छ अंतः करणाने गातात. विशेषतः तरुणमंडळी अशा स्वरुपाच्या लेंगी सादर करण्यात अग्रेसर असतात. या प्रकारच्या लेंगीमध्ये स्त्री-पुरुषाच्या देहाचे, कामक्रिडेचे, प्रणयभावनेचे अगदी उघडेनागडे वर्णन केलेले असते. या प्रकारच्या लेंगी गोरगणात खूप लोकप्रिय असतात. एका चढाओढ एक अशा स्वरुपाच्या लेंगी गीते म्हणण्याची जणू होड (शर्यत) गोरगणात होळीप्रसंगी लागते. या लेंगीना 'चावट लेंगी' असेही म्हणतात. या आशयाच्या लेंगीगीताचे कोणालाही वाईट वाटत नाही व रागही येत नाही. या प्रकारची एक लेंगी पहा.

"खेलत काकरा मारोरे नायकेरे लडाका
काकरा मारो तो आचो काम कीदो
कन कसेन बलायोरे नायकेरो लडका
कन बलायो तो आचो काम कीदो,
बकडी कसेन भरोरे - नायकेरो लडका
बकडी भरो तो आचो काम कीदो

छाती कसेन मसळोरे - नायकेरो लडका

छाती मसळोतो भलोकाम कीदो

मुंडो कसेन चुमोरे - नायकेरो लडका

मुंडो चुमोतो भलो काम की दो

हेट कसेन पाडोरे - नायकेरो लडका."[८]

प्रस्तुत लेंगीगीतात प्रणयभावनेचे उत्तान व खूप श्रृंगारिक वर्णन केले असून कोणतीही मर्यादा न ठेवता अगदी भडकपणे लैंगिक भावनेचे वर्णन केले आहे. या लेंगीगीतामधील तरुणी म्हणते की, तांड्यातील नायकाच्या मुलाने मला खेळता खेळता खडा (काकरा) का बरे मारला असेल? अरे बाबा खडा मारला इथपर्यंत ठिक आहे; परंतु नंतर जवळ कशाला बोलवतोय? हेही ठिक आहे मात्र जवळ बोलवल्यावर बाहुपाशात (बकडी) कशाला घेतलास रे! तेही ठिक आहे मात्र आलिंगन दिल्यावर माझे ऊरोज (छातीया) कशाला बरे पिळलास (मसळो) ऊरोज पकडेल तेही ठीक परंतु चुंबन कशासाठी घेतलासरे ? नाठाळ कुठला !

अशा स्वरुपाचे श्रृंगारिक भावनेने तुडंबभरलेले हे लेंगीगीत खूप उत्साहात आणि जोरदारपणे गोरपुरुष धुंदफुंद होऊन पाईनृत्य करत-करत बेहोशीत सादर करतात. या प्रकारच्या लेंगी व पाईनृत्यावेळी एक परमोच्च टोक होळी उत्सवाने गाठलेले असते. त्यांचा आनंद गगनाला गवसणी घालत असतो.

**भांडलेंगी :**

भांडलेंगी हा एक अनोखा लेंगी गीताचा प्रकार होळी उत्सवाच्या वेळी गोरगण खूपच उत्साहाने म्हणतात. या प्रकारात स्त्री-पुरुष लेंगीद्वारे एकमेकांना अर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहतात. विशेषतः नायक, कारभारी व ज्या व्यक्तिची आपण थट्टा-मस्करी करु शकतो अशा व्यक्तीना भांडलेंगीद्वारे होळीउत्सवाप्रसंगी मनसोक्त शिव्या देण्यात येतात. विशेष म्हणजे कोणाला कितीही शिव्यादिल्या तरी त्याचे कोणालाच वाईट वाटत नाही. अशा स्वरुपाच्या विविध विषयावरच्या भांडलेंगी मोठ्या प्रमाणात होळी उत्सवाप्रसंगी गोरस्त्री-पुरुष म्हणतात. भांडलेंगी आकाराने लहान बांध्याच्या असतात. त्याची रचना एका कडव्याची असते. अल्पाक्षरत्व हे भांडलेंगीगीताचे वैशिष्ट्य आहे. उदाहरणादाखाल एक भांडलेंगी या ठिकाणी नमूद केलेली आहे.

"इ गेरीया कांई कामेरो छेणी

गेरणीत भुंडो दिसावरे धाटो धाटो हिंडच..."[९]

हा पुरुष (गेरीया) काहीच कामाचा नाही. हा तर गडे आम्हा स्त्रियांपेक्षाही (गेरणी) नेभळट दिसतोय. आमच्या धाकाने हा तर इकडे तिकडे लपत-छपत फिरतोय. भांडलेंगीचे दुसरे एक एक अप्रतिम उदाहरण पहा.

"छोरा काड्ये गेरणी धुंड करीया

छोरा काड्ये गेरणी धुंड करीया

टाळटाळ गेरीया तोपर छोडीया

आचेआचे बोकडेरो गेर करीया"[१०]

ये गोरतरुणी (गेरणी) तू मुलाला जन्म दे, तुझ्या नवऱ्याशी ते होत नसेल तर चांगले तरणेबांड व देखण्या तरुणांची तांड्यात काही वानवा नाही. तू मुलाला जन्म दिला तरच होळीउत्सव आनंदात साजरा करता येईल आणि धुंड हा संस्कारविधीही करता येईल आणि त्याशिवाय 'गेरही' करता येणार नाही. तू मुलाला जन्म तर दे! आम्ही पहा मग धस्टपुष्ट बोकडांचा 'गेर' (कंदुरी) कसे करतो. धुंड हा संस्कारविधी गोरवट नुसार फक्त मुलांच्याच वाट्याला येतो. मुलींचा गोरसंस्कृतीत धुंड हा संस्कार विधी करीत नाही. भांडलेंगीच्या संदर्भात क्षमायाचना करणारी एक मार्मिक लेंगीं गोरमाटी म्हणतात. ती अशी-

"काकीये दादीयो रीस मत करजो

होळी बोलयचे भांड"[११]

माझ्या काकी व आजीनों तुम्ही राग मानू नका. आम्ही तुम्हास (शिवी) देत नाही. छे तसे आम्ही मनात देखील आणू शकत नाही. ही होळी वांढाळ आहे. हीच भांड म्हणते. म्हणूनच या स्वरुपाचे लेंगीगीत उत्स्फूर्तपणे आमच्या मुखातून बाहेर पडतात. तुम्ही ते गोड माणून घ्या व आम्हाला मुलं समजून क्षमा द्या. भांड लेंगीमध्ये बीभत्सता आणि अश्लीलता ठासून भरलेली असते. कामक्रिडेचा नि:संकोचणे या लेंगीगीतात उल्लेख करण्यात येतो.

**फागलेंगी :**

गोरगणांची होळी ज्या दिवशी जाळण्यात येते त्याच्या दुसऱ्या दिवशी गोरगणात 'फाग' खेळतात. 'धुळंडी' किंवा 'धुळवड' या शब्दासाठी गोरबोलीत 'फाग' असा शब्द रुढ आहे. या संदर्भात रुक्मिणी पवार म्हणतात, "बंजारा समाजात रंग खेळणे याला 'फाग' म्हणतात तर राजपुतांमध्ये 'फागोत्सव' म्हणतात."[१२] 'फाग' च्या दिवशी गोरगणात एकमेकांच्या अंगावर रंग उधळतात. रंग उधळताना जी लेंगीगीते म्हणतात त्यास 'फागलेंगी' असे गोरमाटी संबोधतात. पूर्वी पळसफुला पासून बनवलेले नैसर्गिक रंग फागसाठी गोरगणात उपयोगात आणले जात असे. पळसफुलास गोरबोलीत 'केसूला' असा शब्द प्रचलित आहे. या दिवशी म्हटल्या जाणारी एक सुप्रसिध्द गोरमाटी फागलेंगी पुढील प्रमाणे आहे. फागलेंगी या आकाराने अगदी लहान असतात. स्त्री-पुरुष म्हणजे गेरीया व गेरणी एकमेकांच्या अंगावर रंग उधळताना या लेंगी म्हणतात,

"फागणरो महिना गिरधारी

गिरधारीरे रंगाव भारी

अशी फागणेम गेरणी खेलच."[१३]

प्रस्तुतचा महिना (फागणेरो) म्हणजे रंगोत्सवाचा महिना आहे. अशा या महिन्यात गोरस्त्रिया खूप आनंदाने रंगोत्सवात सहभागी होतात आणि त्या खूपखूप रंग उधळतात. दुसरे एक गोरस्त्रियांचे प्रसिध्द फागलेंगी गीत पहा..

"मत मारो मोहन रंग पिचकारी

भर पिचकारी मारी छातीयान मारो

भिजागीची चोळी मारी रेषमेरी

मत मारो मोहन रंग पिचकारी."[१४]

गेरियाला उद्देशून गोरस्त्रिया उपरोक्त फागलेंगी गातात. अरे मनमोहना रंगाने भरलेली रंगपिचकारी तू माझ्या अंगावर उधळू नकोस; त्यामुळे माझी रेषमाची चोळी पार ओली चिंब झाली नारे!

अशा आशयाच्या खूप फागलेंगी गोर स्त्री-पुरुष सवाल जबाब म्हणून गातात. या लेंगी रचनेच्या दृष्टीने फारच छोट्या छोट्या कडव्याच्या असतात. अल्पाक्षरत्व हे या लेंगीचे विशेष म्हणता येईल.

**वाजणालेंगी :**

हा गोरमाटी लेंगीगीताचा लक्षवेधक रचनाप्रकार आहे. तांडा नायकाच्या घरी ज्यावेळी गेरिया होळी उत्सव साजरा करण्याची पूर्वपरवानगी घेण्यासाठी जातात त्यावेळी नायक 'गेरियांना' वाजणालेंगी म्हणण्यास सांगतो. जोपर्यंत गेरिया वाजणालेंगी म्हणत नाही तोपर्यंत त्यांना तांडाप्रमुख अत्यंत असा मानाचा समाजला जाणारा एक रुपया देत नाही. उदाहरणा स्वरुप एक वाजणा लेंगीगीत या ठिकाणी नमूद केले आहे ते पहा.

"अनभाई हारेन थाके रक गेरीया उतरे
अनभाई आयेन हुबे रक नायकेर दरबार
अनभाई नायक दिनो रक रपीया पाच जो
अनभाई पाचन मानो रक पचीस तम जाणजो
अनभाई ओरीगोरणी दिनीर छळहाळ बोकडो
अनंभाई झंडान झुबको होळी माता पामणी
अन पडी तुकारी बो.. बो..."[१५]

**भावार्थ :** खूप थकले, भागलेले (हारेथाके) तांड्यातील तरुण मंडळी (गेरिया) तांडाप्रमुखाच्या (नायकाच्या) दारी आलेले असून ते नायकास मानाचा एक रुपया द्या अशी विनवणी करीत आहेत. नायक त्यांच्या विनंतीस मान देवून पाच रुपये भेट म्हणून त्यांना देतात व हे पाच रुपये नसून पंचवीस रुपये आहेत असे समजा असे नायक त्या तरुणांना म्हणतो. होळीचा उत्सव द्विगुणीत व्हावा म्हणून तांडा नाईकीनीने ही त्या तरुणांना (गेरीयांना) एक बोकूड देवू केला आहे. आता तुम्ही खूप आनंदाने होळी खेळा कारण होळी वर्षातून एकदाच येते म्हणून हर्षोल्हासात ती साजरी करा. गोरधाटी जपा.

**धुंडलेंगी :**

गोरगण होळी हा उत्सव लहान मुलांचा बारसा (नामकरण विधी) हा संस्कार विधी म्हणून साजरा करतात. 'धुंड' म्हणजे लहान मुलांचे बारसे. या संदर्भात डॉ. केशव फालके म्हणतात, "बंजारा समाज मे लडकों का नामकरण तथा प्रथम बार सिर के बाल उतारने का अनुष्ठान सिर्फ होली के त्यौहार में होता है इसे 'धुडं' कहॉ जाता है।"[१६] 'धुंड' करताना सुध्दा गोरगणात गीत म्हणण्याची प्रथा रुढ आहे. धुंडलेंगी गीताचे स्वरुप वेदातील मंत्रोच्यारासारखे असते. प्रस्तुत लेंगीगीताचे स्वरुप गद्यात्मक असते. दोन पुरुष मंडळी बांबू पकडतात व त्या बांबूला इतर पुरुष मंडळी दंडूके हातात घेऊन मारतात. पोकळ बांबू व दंडुके यांच्या घर्षणातून निर्माण होणाऱ्या ध्वनीच्या तालावर प्रस्तुत लेंगीगीत सामूहिकरित्या गोरस्त्री-पुरुष म्हणतात. या गीतालाच 'धुंडलेंगी' असे म्हणण्याची प्रथा आहे. उदाहरणार्थ पुढील धुंडलेंगी गीत पहा.

"चरीक चरीया चंपा मोरं
जू जू चंपा लेराल
उट सपुती घर की नार

ये छोरारो हुवो तेवार

आई होळी वाजं ठोळी

सिकचं, सिकावचं

सिके राज करचं

सिके केरी सात पोळी

ठोकर खाती आई होळी

बो... बो... बोss"[१७]

या गीतास गोरमाटी धुंडलेंगी असे म्हणतात. हे गीत म्हटल्याशिवाय 'धुंड' हा पवित्र असा संस्कारविधी संपन्न होत नाही. ही लेंगी धुंड होऊ घातलेल्या मुलाच्या आईला उद्देशून गेरिया व गेरणी गातात. या धुंड लेंगी गीताचा भावार्थ असा की, ये गोर स्त्री तुझ्या मुलाचा धुंड हा पवित्र संस्कारविधी संपन्न झाला असून या पुढे तू आपल्या मुलावर चांगले संस्कार कर, त्याला सुशिक्षित कर, का तर शिकलेली लोकच दुसऱ्याना ज्ञानी करतात व हीच माणसे राजसताही हस्तगत करतात आणि शेवटी सर्वांनाच सुखी व संपन्नही करतात. म्हणून तू तुझ्या मुलावर भविष्यात उत्तम सुसंस्कार कर. चमेलीच्या फुलाच्या सुगंधासारखा तुझ्या मुलाच्या किर्तीचा सुगंध दरवळत राहो.

**होळी निरोपाची लेंगी :**

गोरगणांचा होळीउत्सव तीन दिवस रंगतो. लेंगीगीत मात्र गोर पुरुष व स्त्रिया होळीच्या अगोदर एक महिन्यापासूनच म्हणत असतात. छडलेंगीचे, बेटीर लेंगीत रुपांतर होते. जस जशी होळी समीप येते तसतशी हुबीर लेंगी गाऊन पाईनृत्याला सूआरंभ होतो. होळीउत्सवाच्या दोन दिवसात तर भांडलेंगी स्त्री पुरुष चढाओढीने म्हणतात. रंगपंचमीला फागलेंगी गातात. होळीच्या तिसऱ्या दिवशी तांडाभर फिरुन 'गेर' गोळा करतात. 'गेर' म्हणजे सामूहिकपणे जमा केलेली लोकवर्गणी. या गेरमधून जमा झालेल्या उत्पन्नातून बोकूड व दारु खरेदी करतात. बोकूड कापल्यानंतर त्या मटनाचे समसमान भाग करतात व प्रत्येकाला एक एक भाग देतात. गेर मागणे हा गोर होळी उत्सवाचा अखेरचा दिवस असतो. या दिवसानंतर लेंगी म्हणू नये व पाईनृत्यही करु नये असा संकेत गोरसमाजात रुढ आहे. हा संकेत निरोपाची लेंगी गाऊन सुरु होतो. या प्रकारची एक लेंगी पहा -

"होळी आईरे होळी डगर चाली

गेरीयान गेरणी दे चाली

गेरीयान बेटा दे चाली"[१८]

**अर्थ :** होळीउत्सव केव्हा सुरु झाला व कधी संपला हे नाचगाण्यात कळलेच नाही. मात्र होळीमुळेच तरुणांना तरुणी मिळाल्या त्यांच्यात प्रेमाचे भावबंध जुळले आणि तरुण विवाहित जोडप्यांना 'पुत्ररत्न प्राप्त होईल' असा आशीर्वाद देवून ही होळी आता चालली आहे. आपणही तिला नमन करु या आणि दोन्ही कर जोडून हसत खेळत निरोप देऊयात.

**समारोप आणि निष्कर्ष :**

अशाप्रकारे गोरगणात गोरवटनुसार पिढ्यान् पिढ्या होळीउत्सव गोरशैलीने साजरा करण्याची मौलिक परंपरा

अव्याहतपणे सुरु आहे. गोरमाटी स्त्री-पुरुष चातक पक्षाप्रमाणे होळीउत्सवाची प्रतीक्षा करीत असतात. होळीउत्सव जसाजसा समीप येऊ लागला की, गोर डफड्याच्या तालावर लेंगीगीत म्हणायला प्रारंभ करतात आणि सामूहिकपणे फेर धरुन पाईनृत्यही करायला लागतात. एकप्रकारे होळीउत्सवाद्वारे गोरमाटी स्त्री-पुरुषांना जीवन जगण्याची नवी उर्मी व चेतना मिळते. होळीकडे गोरसमाज एक निखळ विधी आनंदोत्सव म्हणून पाहतो. तो एक विधीचा भाग असतो. अशी गोरमाटींची पारंपरिक स्वरुपाची होळी आज खूपच बदलली आहे. इतर समाजाच्या सांस्कृतिक प्रभावामुळे गोरगण आपल्या पारंपरिक होळीउत्सवाकडे पाठ करु लागला आहे. आजच्या तरुण पिढीतील गोर स्त्री- पुरुषांना तर लेंगी गीतेही गाता येत नाही आणि पाईनृत्यही करता येत नाही. होळी उत्सवाप्रसंगी म्हटल्या जाणारी लेंगी व पाईनृत्य आणि धुंड व धबुकार या विधीच तर गोरगणांची स्वतंत्र ओळख व सांस्कृतिक विलगता आणि गोरवट आहे. ही विलगताच (गोरधाटी) आज कोर संस्कृतीच्या प्रभावामुळे काळाच्या पडद्याआड आदृश्य होण्याच्या कगारावर आहे. त्यामुळे होळीउत्सवाप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या लेंगीगीताचे आज संकलन व संवर्धन करुन संपादनकरण्याची अत्यंत गरज निर्माण झालेली आहे. नाही तर ही मौल्यवान अशी गोरसंपत्ती व सांस्कृतिक संचित कालौघात नष्टप्राय होईल आणि पुढची पिढी या मौखिक लोकधनास व संचितास मुकल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भसूची :**


१. पाटील पांडूरंग कचेश्वर — वनजारी बनजारी, भाग पहिला, सुराकिर्ती प्रकाशन, नाशिक. प्रथम आवृत्ती १९९९, पृ. क्र. १०

२. चव्हाण (डॉ.) मोहन — बंजारा बोलीभाषा : एक अध्ययन, सूर्या प्रकाशन, कानपूर. प्रथमावृत्ती २००७ पृ. क्र. ७८

३. फालके (डॉ.) केशव — बनजारा लोकसाहित्य, संकल्प प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती १९९३, पृ. क्र. ९९

४. वडत्या सुभाष वसराम — वय ५२ वर्ष, मु. धनसळ ता. पुसद जि. यवतमाळ

५. राठोड बंशीराम — वय ६२ वर्ष, मु. गेवराई मर्दा ता. पैठण जि. छ. संभाजीनगर

६. पवार (डॉ.) रुक्मिणी — बंजारा लोकजीवन पद्धती, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती २००५, पृ. क्र. १७०

७. चव्हाण नथ्थू गोपा — लेंगीनायक, प्रकाशक देवीदास मुडे उमरखेड, प्रथमावृत्ती २००३, पृ. क्र. ३७

८. राठोड आत्माराम — गोरवट, साहित्य अकादमी प्रकाशन, दिल्ली. प्रथमावृत्ती २००६, पृ. क्र. ९२

९. राठोड रुक्मिणी जगन्नाथ — वय ७२ वर्ष, मु. गेवराई तांडा ता. पैठण जि. छ.संभाजीनगर

१०. राठोड आत्माराम कनीराम — गोरबंजारा इतिहास व लोकजीवन, गोरवट प्रकाशन, मोहा. प्रथमावृत्ती १९९४, पृ. क्र. १२६

११. राठोर कल्याण शामा — वय ६८ वर्ष, मु. कचनेर तांडा, ता. पैठण जि. छ. संभाजीनगर

१२. पवार (डॉ.) रुक्मिणी — बंजारा लोकजीवन पद्धती उनि, पृ. क्र. ४४

१३. राठोड मोतीराज — गोरमाटी, बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद औरंगाबाद. प्रथम आवृत्ती १९९८, पृ. क्र. ६३

१४. आडे सोनीबाई लिंबा — वय ७५ वर्ष, मु. उपवनवाडी, ता. पुसद जि. यवतमाळ

१५. राठोड (डॉ.) सुनील — बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते, मधुराज पब्लिकेशन्स, पुणे. प्रथमावृत्ती २०१२, पृ.

क्र. १३४

१६. फालके (डॉ.) केशव – बनजारा लोकसाहित्य, उनि, पृ. क्र. ३८

१७. राठोड हिरा – वय ७६ वर्ष, मु. सावरगाव ता. पुसद जि. यवतमाळ

१८. जाधव (डॉ.) यशवंत – बंजारा जाती समाज और संस्कृती, वाणी प्रकाशन, दिल्ली. प्रथमावृत्ती१९६८, पृ. क्र. ११५